## नि.दि.दा.क्र.७७/२०२२ मधील निशाण क्र.८८ वरील आदेश (CNRNO.MHSI09003362022)

०१. प्रस्तूतचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.२१ यांचे नाव कमी करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. अर्ज व त्यावरील जबाबाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०३. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी वादपत्रातून प्रतिवादी क्र. २१ यांचे नाव दाव्यातून कमी करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे. वादीच्या कथनानुसार व सदर अर्जाच्या अनुषंगाने वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२१ संतोष सखाराम पुजारे हे प्रतिवादी क्र.११ म्हणून प्रस्तूत वादपत्रात दाखल आहेत. सदरची चुक ही टंकलेखन दोषामुळे झाली असून सदर प्रतिवादी क्र.२१ चे नाव कमी करुन त्यापुढे प्रतिवादी क्र.१४ ते २१ ऐवजी प्रतिवादी क्र.१४ ते २० अशी दुरुस्ती करून मिळणेस विनंती केली आहे. परीणामी, प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास मुळ प्रकरणाच्या स्वरुपात व मागणीत कोणताही बदल संभावत नाही.

०४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी यांना आपल्या कथनांमध्ये दुरुस्ती करता येते.

प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्ती तांत्रिक असल्याने प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल संभावत नाही. सबब, प्रस्तावीत दुरूस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता खालील आदेश :

**– <u>आ दे श</u> –**

०१. निशाणी क्र. ८८ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादीने प्रस्तावीत दुरूस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पूर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्य समजण्यात यावा.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.22 10:57:50 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )
दिनांकः २१/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.